# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:- कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि.१३ ऑगस्ट,२०२१

जळगाव दि.१३(प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता विविध शुल्कात सवलत देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे तसेच उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय,मुंबई यांच्या निर्देशान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर जिमखाना शुल्क, आपत्कालीन व्यवस्थापन शुल्क, विद्यार्थी उपक्रम शुल्क, गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी, अश्वमेध शुल्क, स्नेह संमेलन शुल्क व व्यक्तीमत्व विकास व व्यवसाय रोजगार मार्गदर्शन शुल्क पुर्णपणे माफ करण्याचा व ग्रंथालय शुल्क आणि प्रयोगशाळा शुल्क (विज्ञान) शुल्क पन्नास टक्के माफ करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून ज्या विद्यार्थ्यांचे आई/वडील/पालक कोविड-१९ च्या प्रादर्भावामुळे मयत झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचे पदवी/पदव्युत्तर शिक्षण पुर्ण होई पर्यंतचे संपूर्ण शुल्क माफ करण्याचा सुध्दा निर्णय घेण्यात आला आहे. सदरची सवलत ही शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता लागू असेल. वरील शुल्क माफी व्यतिरिक्त इतर शुल्क विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार आकारण्यात येईल. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क तीन हप्त्यात भरण्याची सवलत सुध्दा देण्यात आली असून विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थ्याकडे थकीत शुल्क असल्यास परीक्षेचा अर्ज अडवण्यात येऊ नये असेही निर्देश महाविद्यालयांना विद्यापीठाने पत्राद्वारे कळविले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त् बातमी आपल्या दैनिकातून प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी